# मिरा-भाईंदरमध्ये ९८% सर्वेक्षण पूर्ण

**म. टा. वृत्तसेवा,** मिरा-भाईंदर

मिरा-भाईंदर महापालिकेने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या निर्देशांनुसार, मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील सामाजिक, शैक्षणिक मागासलेपण, तपासण्यासाठी अडीच लाख कुटुंबाचे सर्वेक्षण शुक्रवारी पूर्ण केले आहे. शहरातील सर्वेक्षण ९८ टक्के पूर्ण झाल्याचा दावा पालिका प्रशासनाने केला आहे. याचा अहवालही महापालिकेने आयोगाला सादर केला आहे.

मिरा-भाईंदरमध्ये २३ फेब्रुवारी २०२४पासून मराठा समाज, तसेच खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण महापालिका प्रशासनाकडून सुरू करण्यात आले होते. त्यासाठी पालिकेने शिक्षक, लिपिक व इतर असे तब्बल ६००हून अधिक कर्मचारी नेमले होते. हे सर्वेक्षण पूर्ण करण्यासाठी सुरुवातीला ३१ जानेवारीची मुदत देण्यात आली



होती. परंतु, सर्वेक्षणाचे काम पूर्ण न झाल्याने आणखी दोन दिवसांची, म्हणजेच २ फेब्रुवारीपर्यंतची मुदतवाढ देण्यात आली होती.

त्यानुसार, शुक्रवारी सायंकाळपर्यंत मिरा-भाईंदर महापालिकेने दोन लाख ४९ हजार ९०० कुटुंबांपैकी दोन लाख ४५ हजार ४०० कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे. साडेचार हजार कुटुंबांच्या घरी कोणीही नसणे व माहिती देण्यास नकार देणे आदी कारणामुळे सर्वेक्षण करण्यात आले नसल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली. शहरातील एकूण कुटुंबांच्या तुलनेत ९८ टक्के कुटुंबांचे सर्वेक्षण पूर्ण झाल्याचे प्रशासनाने म्हटले आहे.

## दाव्यावर प्रश्नचिन्ह

मिरा-भाईंदर महापालिकेने ९८ टक्के सर्वेक्षण पूर्म केल्याचा दावा केला असता, तरी अनेक भागांत सर्वेक्षण करण्यासाठी पथके आली नसल्याचे मराठा समाजातील नागरिकांकडून सांगण्यात आले. काही ठिकाणी सर्वेक्षण पथके आली असली, तरी त्यांच्याकडून किरकोळ माहिती घेण्यात आली आहे. त्यामुळे महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणावर अनेकांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# उत्तनच्या मच्छिमारांचे मार्ग होणार सुरक्षित

## दीपस्तंभ उभारण्यास सुरुवात

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

ठाणे व पालघर जिल्ह्यातील मच्छिमारांना खोल समुद्रात मासेमारीसाठी ये-जा करण्यासाठी मोजकेच मार्ग आहेत. या मार्गांवर तीन दीपस्तंभ उभारण्याच्या कामाला नुकतीच सुरुवात करण्यात आली आहे. त्यामुळे रात्रीच्या वेळी समुद्रात जाताना बोटी दगडाला आदळून होणाऱ्या अपघातांतून मच्छिमारांची सुटका होणार आहे. यापूर्वी एका मार्गावर दीपस्तंभ उभारण्यात आला आहे.

पालघर जिल्ह्यातील नायगाव व वसई भागातील मच्छिमारांना समुद्रात मासेमारीसाठी जाण्यासाठी पूर्वी असलेला मार्ग वाळू साठल्याने बंद झाला आहे. त्यामुळे उत्तन, वसई, नायगाव व भाईंदर बंदरातील मच्छिमार बोटींची समुद्रात ने-आण करण्यासाठी तीन मार्गांचा वापर करत आहेत. यातील एक मार्गावर मधल्या काळात दीपस्तंभ उभारण्यात आला आहे. मात्र उर्वरित मार्गांवर रात्री विद्युत दिवे नसल्याने, समुद्रात जाताना बोटी समुद्रातील खडकाला आदळून अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात होती.

या पार्श्वभूमीवर, सुरक्षेच्या दृष्टीने आणखी काही दीपस्तंभ समुद्रात उभारण्याची मागणी उत्तनच्या मच्छिमारांकडून केली जात होती. खासदार राजन विचारे यांनी या कामासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करत, जिल्हा नियोजन समितीतून तीन कोटी ५२ लाखांचा निधी प्राप्त केला होता. परंतु हे काम आवश्यक परवानग्यांअभावी अनेक दिवसांपासून रखडले होते. नुकत्याच या परवानग्या प्राप्त झाल्या असून, कंत्राटदाराला कार्यादेशही अदा करण्यात आला आहे. त्यामुळे तीन दीपस्तंभ उभारण्याचे काम शनिवारी सुरू करण्यात आले असून त्याचे भूमिपूजन खासदार विचारे यांच्या हस्ते पार पडले.



### नुकसानभरपाई देण्याची मागणी

उत्तनच्या सिरीयल अँथोन गवत्या यांच्या मालकीची 'पवित्रा मारिया' नामक बोट समुद्रकिनारी नांगरलेली असताना, काही दिवसांपूर्वी तिला अचानक आग लागली होती. यात या बोटीचे व मासेमारीसाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले होते. या कुटुंबाला नुकसानभरपाई देण्याची मागणी विचारे यांनी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे पत्राद्वारे केली आहे.

Scanned with OKEN Scanner

# वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या

म. टा. वृत्तसेवा, मिरा-भाईंदर

## मिरा-भाईंदर वसई-विरारमध्ये घोषणा

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालय क्षेत्रातील पोलिस उपायुक्त व सहायक पोलिस आयुक्त पदावरील सहा अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या बदल्या करण्यात आल्या आहेत.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या विविध पोलिस ठाण्यांत कार्यरत वरिष्ठ पोलिस निरीक्षक व उपनिरीक्षक पदावरील अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मधल्या काळात करण्यात आल्या आहेत. त्यामुळे सहायक पोलिस आयुक्त व पोलिस उपायुक्त पदावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्यांची प्रतीक्षा होती. अखेर, शुक्रवारी रात्री उशिरा अप्पर पोलिस आयुक्त श्रीकांत पाठक यांनी त्यांच्या अंतर्गत बदल्यांचे आदेश जारी केले आहेत. यात परिमंडळ एकचे पो. उपायुक्त जयंत बजबळे यांची मुख्यालय उपायुक्तपदी, तर मुख्यालयात असणाऱ्या प्रकाश गायकवाड यांची परिमंडळ एकच्या उपायुक्तपदी बदली करण्यात आली आहे. सहायक आयुक्त विजयकुमार मराठे यांची मुख्यालयातून मिरा रोड विभागात, नियंत्रण कक्षातील बजरंग देसाई यांची नवघर विभागात, मिरा रोड विभागात असणाऱ्या महेश तरडे यांची नियंत्रण कक्षात, नवघर विभागात असणाऱ्या उमेश माने-पाटील यांची तुळींज विभागात बदली करण्यात आली आहे.

# मीरा-भाईंदरकरांना घेता येणार योजनांचा लाभ

## 'शासन आपल्या दारी'अंतर्गत होणार शिबिरे

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदर महापालिकेच्या वतीने शासन आपल्या दारी या योजनेअंतर्गत ६ व ७ फेब्रुवारी रोजी सेवा - सुविधा शिबिरांचे आयोजन केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाच्या 'शासन आपल्या दारी' या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी ६ फेब्रुवारी व ७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजता या कालावधीत विविध योजनांबाबत माहिती उपलब्ध करून देण्याकरिता आयुक्त संजय काटकर यांच्या निर्देशानुसार या शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

६ फेब्रुवारी रोजी मॅक्सस मॉल भाईंदर, नवघर नाका भाईंदर पूर्व व टीएमटी बसस्थानक मीरा रोड येथे व ७ फेब्रुवारी रोजी मॅक्सस मॉल, स्वातंत्र्यवीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे भवन, काशिमीरा पोलिस ठाण्याच्या जवळ या सेवा-सुविधा शिबिरांचे आयोजन होणार आहे.



### गरजूंनी लाभ घ्यावा, आयुक्तांचे आवाहन


या शिबिरात आयुष्मान योजना, आयुष्मान क्षयरोग व इतर योजना, जननी सुविधा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, पी.एम. स्वनिधी, क्षयरोग टी.बी.टी. योजनेसह मालमत्ता कर, कर उतारा, मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे, निराधार/विधवा/घटस्फोटित महिलेच्या मुलामुलींना, शैक्षणिक आर्थिक मदत, मुली व महिलांसाठी कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत, पुरुष कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत, विधवा/निराधार महिलेकरिता माय माऊली योजनाअंतर्गत आर्थिक मदत, विविध परवाने, दिव्यांग व्यक्तींकरिता साहित्य व उपकरणे पुरवठा आदींची माहिती देण्यात येणार आहे. शहरातील गरजू नागरिकांनी शिबिरात उपलब्ध विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त संजय काटकर यांनी केले आहे.

# कैद्यांना कारागृहात खायला मिळणार गोडधोड पदार्थ

## अनेक वस्तू उपलब्ध : गरजेनुसार कैदी करू शकतात खरेदी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** ठाणे जिल्हा मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक राणी भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकारी-कर्मचारी हे कारागृहातील व्यवस्थापन करीत असतात. कैद्यांना पाहिजे त्यावेळी ते खरेदी करू शकतात. प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन यासह महात्मा गांधी जयंतीनिमीत्त कारागृहातील सर्व कैद्यांना शासकीय खर्चातून गोड पदार्थ देण्यात येतात.



### ठाणे जिल्हा कारागृहात चार हजार २६० कैदी

ठाणे जिल्हा मध्यवर्ती कारागृहात एकूण ४ हजार २६० कैदी बंदिस्त आहेत. त्यात पुरुष कैद्यांची संख्या ४ हजार १२७, तर महिला कैद्यांची संख्या १३३ इतकी आहे. ठाणे कारागृहाची कैदी ठेवण्याची क्षमता हे केवळ १ हजार १११ लोकांसाठीची आहे.

### स्वखर्चातून काय?

फळे : सफरचंद, पेर, मोसंबी, संत्री आदी. समोसा, उतप्पा, पावभाजी, ढोकळा, पनीर भाजी.

### मिठाईमध्ये काय?

कारागृहात जिलेबी, गुलाबजामून, बुंदी, तिळाचे लाडू, पुरणपोळी यांसारख्या मिठाई कैद्यांना मिळतात.

### दिवसभरात काय?

दैनंदीन दुध, चहा, जेवण तसेच उपहारगृहात उपलब्ध खाद्यपदार्थ मिळतात.

### कारागृहातील कॅन्टीनमध्ये काय काय मिळते?

- उपहारगृहातून प्रत्येक महिन्याला ८ हजार रुपये खर्च मर्यादित वस्तू व पदार्थांची खासगी रकमेतून मागणीनुसार विक्री करण्यात येते.
- एकूण ७६० जीवनावश्यक पदार्थ व वस्तूंचा समावेश आहे. नमकीन बेकरी पदार्थ, अल्पोपाहार पदार्थ, फरसाण, वेफर्स, भाकरवडी, स्नॅक्स, समोसा, लोणचे, ठेचा आदी मिळते.

### करमणूक, शिक्षणाचीही सोय

१ **करमणूक :** कैद्यांना एफ.एम.रेडीओ सुविधा, दूरदर्शनसंच ज्यात बातम्यांचे चॅनल, खेळ, चित्रपट आदी पाहण्यासाठी चॅनल उपलब्ध असतात. खाजगीसंस्थेच्या माध्यमातून संगीत कार्यक्रम, माहिती सत्रे, क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. कैद्यांना व्हॉलीबॉल, कॅरम, चेस, यासारख्या खेळाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते.

२ **शैक्षणिक सुविधा :** कारागृहातील पुरुष व महिला कैद्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र कार्यरत असून सदर अभ्यासकेंद्राच्या माध्यमातून बी.ए. व बी.कॉम. अभ्यासक्रम सुरु आहेत. सन- २०२३ - २०२४ या शैक्षणिक वर्षात ३२ कैद्यांनी पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेतला आहे.

Scanned with OKEN Scanner

# गीत रामायणासह वाद्यांच्या जुगलबंदीने रसिकमने तृप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या इंद्रलोक येथील बाळासाहेब ठाकरे मैदानात सुरू असलेल्या 'विहंग संस्कृती मीरा-भाईंदर आर्ट फेस्टिव्हल'मध्ये गीतरामायण, वाद्यांची जुगलबंदी, भाग्यश्री व धनश्री भगिनींची गाणी आदी संगीत आणि कलेची मेजवानी रसिक प्रेक्षकांनी अनुभवली.

शनिवारी सकाळी संतूरवादक पंडित सतीश व्यास, सतारवादक उस्ताद रफिक खान, तबला वादक पंडित मुकुंदराज देव आणि सनई वादक पंडित शैलेश भागवत यांच्या सादरीकरणाने तसेच वाद्यांच्या जुगलबंदीने रसिक प्रफुल्लित झाले. सायंकाळी संगीत दिग्दर्शक व गायक अजित परब, पार्श्वगायिका सोनाली कर्णिक, पार्श्वगायक निनाद आजगावकर, पार्श्वगायिका केतकी जोशी, पार्श्वगायक अभिषेक नलावडे आणि नृत्यांगना सोनिया परचुरे यांच्या 'गीत रामायणाच्या' सादरीकरणाने वातावरण भक्तिमय झाले होते.




या आर्ट फेस्टिव्हलला उपस्थित गायिका अमृता फडणवीस यांचा सत्कार करताना आयोजक आमदार प्रताप सरनाईक.

## जय श्रीराम रामायण सादर

- ४ फेब्रुवारी रोजी भाग्यश्री व धनश्री या बहिणींचा भावगीते, रामभक्ती गीतांचा सुश्राव्य कार्यक्रम झाला.
- **सायंकाळी ७ वाजता 'जय श्रीराम - रामायण' हे महानाट्य सादर करण्यात आले. सुमारे १५० कलाकारांचा या महानाट्यामध्ये सहभाग होता.**
- एकंदरीतच रविवारी आर्ट फेस्टिव्हलमधील वातावरण राममय झाल्याचे पाहायला मिळत होते.

## मान्यवरांनी दिली भेट

शिवगौरव पुरस्काराचे मानकरी वेदमूर्ती गजानन ज्योतकर, मुंबईचे पोलिस आयुक्त विवेक फणसाळकर, आमदार गीता जैन, रवींद्र फाटक, माजी भारतीय क्रिकेट संघाचे कर्णधार मोहम्मद अझहरुद्दीन, गायिका अमृता फडणवीस, एम.सी.ए.चे माजी अध्यक्ष पी.व्ही. शेट्टी, महापालिका आयुक्त संजय काटकर यांसह आयोजक आमदार प्रताप सरनाईक यावेळी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner



खासदार राजन विचारे यांनी शनिवारी या कामाचा शुभारंभ समुद्रात मच्छीमारांसह बोटीने जाऊन केला. तसेच याविषयी मच्छीमारांशी चर्चा केली.

# उत्तन समुद्रातील तीन खडकांवर होणार दीपस्तंभ

## मच्छीमार बोटींना मिळणार सुरक्षित वाट

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदरमधील उत्तनजवळील खोल समुद्रात सऱ्याची वाट, कातल्याची वाट, वाशी खडक येथील खडकांवर एक याप्रमाणे तीन दीपस्तंभ उभारले जाणार आहेत. त्याचे भूमिपूजन शनिवारी सायंकाळी समुद्रातील खडकांवर खा.राजन विचारे यांनी केले. दीपस्तंभामुळे मच्छीमारांना खडकांवर बोटी आदळून होणाऱ्या अपघातांपासून सुटका मिळणार आहे.

भाईंदरच्या उत्तन समुद्रकिनाऱ्यावरील उत्तन, पाली, चौक येथील मच्छीमारांना मासेमारीसाठी समुद्रात जाताना व मासेमारी करून परत येताना समुद्रातील खडक हे रात्रीच्या वेळी अडचणीचे ठरतात. किनाऱ्याकडे येताना खडक न दिसल्याने बोट खडकावर आदळून बोटींचे अपघात व नुकसान होत असे. मच्छीमारांच्या मागणीनंतर याआधी खासदार राजन विचारे यांनी खुट्याची वाट येथे २०१८-१९ च्या जिल्हा नियोजन विभागाकडून ७२ लाखांचा निधी मंजूर करून दीपस्तंभाचे काम पूर्ण करून घेतले होते.

### केला होता पाठपुरावा

यासाठी खा.विचारेंनी जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठपुरावा चालवला होता. २०२१-२२ च्या जिल्हा नियोजनमधून ३ कोटी ५२ लाख निधीची मंजुरी होती. परंतु पर्यावरणाच्या मंजुऱ्या न मिळाल्याने ही कामे करता येत नव्हती. यासाठी दिल्ली येथे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय विभागाचे कोस्टल झोन रेग्युलेशन संचालक यांच्याकडे खा. विचारे यांनी पाठपुरावा करून परवानगी मिळवली.

### कामे लवकर सुरू होतील

यावेळी मच्छीमार नेते बर्नड डिमेलो, जॉर्जी गोविंद, शर्मिला बगाजी, माल्कम कासुघरसह ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, लक्ष्मण जंगम, प्रवीण पाटील, तेजस्वी पाटील, अशोक मोरे, विनायक नलावडे, सम्राट राऊत उपस्थित होते.

उत्तन परिसरात मच्छीमारांसाठी जिल्हा नियोजनमधून डोंगरी चौक येथील लाइट हाउससाठी ९ लाख व डोंगरी चौक जेट्टीसाठी ५ कोटी मंजूर झालेले आहेत, ही कामे लवकर सुरू होतील, असे विचारे यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

दै. सकाळ

# सरकारी योजनांच्या जागृतीसाठी शिबिर

## मिरा-भाईंदरमध्ये दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन

भाईंदर, ता. ४ (बातमीदार) : राज्य सरकारच्या 'शासन आपल्या दारी' या योजनेंतर्गत मिरा-भाईंदर महापालिका कार्यक्षेत्रात विविध योजनांच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवस या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'शासन आपल्या दारी' या योजनेच्या माध्यमातून राज्य सरकारकडून राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मिरा-भाईंदरमधील नागरिकांना उपलब्ध व्हावी, यासाठी ६ व ७ फेब्रुवारीला सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात आयुष्मान योजना, आयुष्मान क्षयरोग व अन्य मोहिमेची योजना, जननी सुविधा योजना, पंतप्रधान मातृत्व वंदना योजना, पंतप्रधान स्वनिधी, क्षयरोग टी.बी.टी. योजना, मालमत्ता कर, उतारा, मालमत्ता हस्तांतर नोंद प्रमाणपत्र देणे या सर्व बाबींची माहिती देण्यात येणार आहे.

५ फेब्रुवारीला मॅक्सस मॉल भाईंदर (पश्चिम), नवघर नाका, भाईंदर पूर्व व टीएमटी बस स्थानक मिरा रोड या ठिकाणी, तसेच ६ फेब्रुवारीला मॅक्सस मॉल भाईंदर (पश्चिम), गोल्डन नेस्ट सर्कल, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे भवन, काशी-मिरा पोलिस ठाणे या ठिकाणी हे शिबिर आयोजित करण्यात आल्याची माहिती आयुक्त संजय काटकर यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

# भाईंदर-दहिसर जोडरस्ता अद्याप मुहूर्ताच्या प्रतीक्षेत

## रेखांकन बदलाचा प्रस्ताव रखडला

भाईंदर, ता. ४ (बातमीदार) : भाईंदर-दहिसर जोडरस्त्याचे काम मुंबई महापालिका स्वखर्चाने करणार आहे. नववर्षाच्या सुरुवातीलाच रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन केले जाणार होते, परंतु या रस्त्याच्या रेखांकनात करण्यात आलेल्या बदलाच्या प्रस्तावाला नगरविकास विभागाची अद्याप मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे रस्त्याचे काम सुरू झालेले नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली.

पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी भाईंदर-दहिसर जोडरस्त्याचा पर्याय निर्माण केला जात आहे. भाईंदर पश्चिमेकडून दहिसर पश्चिमेपर्यंत सुमारे पाच किलोमीटरचा हा रस्ता आहे. या रस्त्याला मिरा रोडही जोडले जाणार आहे. त्यामुळे भाईंदरसह मिरा रोडच्या रहिवाशांना हा रस्ता फारच उपयुक्त ठरणार आहे. हा रस्ता सुरुवातीला एमएमआरडीए करणार होती; मात्र तो आता मुंबई महापालिका स्वखर्चाने बांधणार आहे. रस्त्याला मंजुरी देताना त्याच्या मूळच्या रेखांकनात मिरा-भाईंदरच्या परिसरात काही बदल सुचवण्यात आले होते. त्यानुसार विकास आराखड्यात बदल करून त्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या नगरविकास विभागाकडे मान्यतेसाठी पाठवण्यात आला आहे; मात्र या प्रस्तावाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही.

रस्त्याच्या मार्गात काही खासगी जमिनीदेखील आहेत. त्यांचे भूसंपादन मिरा-भाईंदर महापालिकेला करावे लागणार आहे; मात्र जोपर्यंत रेखांकन बदलाच्या प्रस्तावाला मान्यता मिळत नाही, तोपर्यंत भूसंपादन करणे शक्य होणार नाही. त्यामुळेच रस्त्याचे काम सुरू झालेले नाही, असे महापालिका प्रशासनाचे म्हणणे आहे. वास्तविक जानेवारीतच रस्त्याच्या कामाचा शुभारंभ मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्याचे नक्की करण्यात आले होते; मात्र त्याला अद्याप मुहूर्त मिळालेला नाही.

### दोन हजार २०० कोटींचा खर्च अपेक्षित

1 भाईंदर-दहिसर जोडरस्त्यामधील दीड किमीचा रस्ता मुंबई महापालिकेच्या परिसरात; तर साडेतीन किमीचा रस्ता मिरा-भाईंदरमध्ये आहे. या कामाला सुमारे दोन हजार २०० कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

2 या रस्त्याच्या मार्गात कांदळवन मोठ्या प्रमाणात असून त्या ठिकाणी पूर्णपणे उन्नत मार्ग बांधण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त काही मिठागरांच्या व काही खासगी जागांचाही त्यात समावेश आहे. मिरा रोड पूर्वेकडे जाण्यासाठी मार्गावर उड्डाणपूलही बांधण्यात येणार आहे.



रेखांकन बदलाच्या प्रस्तावाला मान्यता देण्याची कार्यवाही नगरविकास खात्याच्या पातळीवर सुरू आहे. त्यासंदर्भात संबंधितांची बैठकही पार पडली; मात्र रस्त्याच्या कामात अडथळा येणार नाही. ज्या ठिकाणी मार्ग मोकळा आहे, त्या ठिकाणच्या कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. शक्यतो याच महिन्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

- प्रताप सरनाईक, आमदार

### वेळ, पैशांची बचत होण्यास मदत

भाईंदर व मिरा रोडच्या वाहनचालकांना मुंबईला जाण्यासाठी सध्या पाच किमीचा वळसा घालून पश्चिम द्रुतगती महामार्गावर यावे लागते. शिवाय, द्रुतगती महामार्गावर टोल नाकाही असल्यामुळे चालकांना आर्थिक भुर्दंडही सोसावा लागत आहे. भाईंदर-दहिसर जोडरस्त्यामुळे वाहनचालकांचे अंतर व वेळ वाचणार आहे. त्याचप्रमाणे या मार्गावर टोल नसल्यामुळे त्यांचे पैसेही वाचणार आहेत.



Scanned with OKEN Scanner

# उत्तन समुद्रातील खडकावर उभारणार तीन दीपस्तंभ

दै. पुण्यनगरी

## खा. विचारे यांच्या हस्ते शुभारंभ



**मीरा रोड :** उत्तन समुद्रातील सऱ्याची वाट, कातल्याची वाट, वाशी खडक या तीन खडकांवर खा. राजन विचारे यांच्या हस्ते जलभूमिपूजन करून दीपस्तंभ कामाचा शुभारंभ करण्यात आला आहे. भाईंदर उत्तन किनारपट्टीवरील मासेमारी करून उदरनिर्वाह करणाऱ्या गरीब मच्छीमारांच्या बोटी किनारपट्टीवर येत असताना खडक न दिसल्याने त्या बोटी खडकावर आदळून बोटी तुटून बोटीचे नुकसान होत होते. मच्छिमारांचे नुकसान टाळण्यासाठी यापूर्वी खा. राजन विचारे यांनी खुट्याची वाट येथे जिल्हा नियोजन विभागाकडून ७२ लाखांचा निधी मंजूर करून काम पूर्ण केले. त्यानंतर मच्छीमारांच्या मागणीनुसार सऱ्याची वाट, कातल्याची वाट, वाशी खडक येथील तीन खडकांवरही दीपस्तंभ लावण्याची मागणी स्थानिक मच्छीमारांनी केली होती. मच्छिमारांच्या मागणीनुसार खा. विचारे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे मागणी करून २०२१-२२ च्या जिल्हा नियोजनकडून ३ कोटी ५२ लाख निधीची मंजुरी मिळवली. परंतु पर्यावरणाच्या मंजुऱ्या न मिळाल्याने ही कामे सुरू करता येत नव्हती. यासाठी दिल्ली येथे पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय विभागाचे कोस्टल झोन रेगुलेशन संचालक यांच्याकडे खा. विचारे यांनी पाठपुरावा करून या कामासाठी परवानगी मिळवली.

सर्व परवानगी मिळाल्यानंतर कार्यादेश देऊन या कामाचा शुभारंभ खा. विचारे यांनी मच्छीमारांसोबत समुद्रात जाऊन जलभूमिपूजन केले. विचारे यांनी याप्रसंगी उत्तन परिसरात मच्छीमारांसाठी जिल्हा नियोजनमधून डोंगरी चौक येथील लाईट हाउससाठी ९ लाख व डोंगरी चौक जेट्टीसाठी ५ कोटी मंजूर झाले आहेत. लवकरच ही कामे सुरू होतील, असे सांगितले. तसेच वेलंकनी येथे १० रॅम्पची दुरुस्ती व रस्ते विकसित करण्यासाठी ३ कोटी ३५ लाखांचा निधी मिळविण्यासाठी पाठपुरावा सुरू असल्याचे विचारे यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

# नाटकाच्या सरावाला कायमस्वरूपी जागा द्या

## नाट्यसंस्थांची मागणी

**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमध्ये नाटक निर्मिती करणाऱ्या बऱ्याच नाट्यसंस्था आहेत. या संस्थांना नाटकाचा सराव करण्यासाठी स्वतःची जागा उपलब्ध नाही. त्यामुळे नाट्यकर्मीना नाटकाचा सराव करण्यास अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या महापालिकेने नाटकाच्या सरावासाठी पालिकेच्या वास्तूमध्ये कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी मीरा-भाईंदर मधील नाट्यकर्मींनी आयुक्त संजय काटकर यांच्याकडे केली आहे.

मीरा-भाईंदरमध्ये १० ते १५ हौशी नाट्यसंस्था आहेत. या संस्थांकडून गावातील यात्रांमध्ये, इतर स्पर्धांमध्ये भाग घेऊन प्रयोग केले जातात. नाटकाचे प्रयोग करण्यासाठी अगोदर अनेक दिवस सराव करावा लागतो. नाटकाचा सराव करण्यासाठी या नाट्यसंस्थांकडे स्वतःची जागा नाही. संस्थांना खासगी हॉल भाड्याने घेऊन सराव करणे परवडत नाही. अशा अडचणी असताना देखील शहरातील काही नाट्यसंस्थांनी दर्जेदार नाटक निर्मिती करून राज्यस्तरीय नाट्य स्पर्धांत उल्लेखनीय कामगिरी केली आहे.



या नाट्यसंस्थांना सराव करण्यासाठी पालिकेने कायमस्वरूपी महापालिकेचे हॉल किंवा शाळांमधील मोकळी जागा उपलब्ध करून द्यावी. जेणेकरून त्यांना त्याचा फायदा घेता येईल. त्यामुळे आयुक्त यांनी नाट्यसंस्थांची गरज लक्षात घेता, जागा उपलब्ध करून देण्याची मागणी स.न.वि.वि. प्रतिष्ठान व इतर संस्थांनी आयुक्त काटकर यांच्याकडे केली आहे.

दै. पुण्यनगरी

# अटी-शर्तींचा भंग केल्याने स्वच्छतागृहांचा ठेका रद्द

## गुन्हा दाखल करण्याचे आदेश अमलात आणले नसल्याने आश्चर्य व्यक्त

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेने शहरात नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधली आहेत. पालिकेने सार्वजनिक स्वच्छतागृहांच्या दैनंदिन देखभाल-दुरुस्तीसाठी ठेकेदार नियुक्त केला आहे. ठेकेदाराने केलेल्या कराराचा व अटी शर्तींचा भंग केल्यावरून त्याचा ठेका रद्द करण्यात आला आहे. यापूर्वी देखील ठेकेदाराने कराराचा भंग केल्यावरून अगोदर दिलेला ठेका काही महिन्यांपूर्वी रद्द केला आहे. पालिकेची फसवणूक केल्याप्रकरणी सार्वजनिक स्वच्छतागृहांची देखभाल-दुरुस्ती करणाऱ्या ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश प्रशासनाकडून काही दिवसांपूर्वीच देण्यात आले आहेत. परंतु अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छतागृहांचा देखभाल-दुरुस्तीचा ठेका सातत्याने वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेने शहरात विविध भागांत नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुमारे २०० सार्वजनिक स्वच्छतागृहे बांधली आहेत.



या स्वच्छतागृहांची देखभाल-दुरुस्ती ठेकेदारद्वारे सांभाळली जाते. महापालिकेने अगोदर नियुक्त केलेल्या ठेकेदाराने स्वच्छतागृहांत स्वच्छता करण्याचे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगार दिला नसल्याच्या अनेक

> “ स्वच्छतागृहाची दैनंदिन देखभाल व दुरुस्तीसाठी नियुक्त केलेल्या ठेकेदाराने करारनाम्यातील अटी-शर्तींचा भंग केला आहे. त्यामुळे स्वच्छतागृह देखभाल दुरुस्तीचा ठेका आयुक्तांच्या आदेशाने रद्द करण्यात आला आहे. नवीन ठेकेदार नियुक्तीसाठी निविदा प्रक्रिया सुरू असून लवकरच नवीन ठेकेदाराची नियुक्ती केली जाईल. तसेच महापालिकेची फसवणूक केल्याप्रकरणी लवकरच ठेकेदारावर गुन्हा दाखल करण्यात येईल.
>
> **– रवी पवार, उपायुक्त, मीरा भाईंदर महापालिका**

तक्रारी आहेत. प्रकरण उघडकीस आले होते. त्या कर्मचाऱ्यांच्या पगाराचे पैसे बँकेत न भरताच महापालिकेकडून देयके मंजूर करून घेतली असल्याचे काही दिवसांपूर्वीच प्रकरण उघडकीस आले. नंतर त्या ठेकेदाराचा ठेका रद्द करून त्याच्या जागी नव्या ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली. स्वच्छतागृहांमध्ये अस्वच्छता असणे, आवश्यक साहित्य उपलब्ध करून न देणे, कर्मचाऱ्यांचा पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत त्यांच्या खात्यात जमा न करणे, स्वच्छतागृहात सफाई कर्मचाऱ्यांची संख्या कमी असणे, स्वच्छतागृहांची स्थिती असमाधानकारक असणे, स्वच्छतागृहातील अस्वच्छतेमुळे नागरिकांची गैरसोय होणे इ.निष्काळजीपणा ठेकेदाराने केला असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते.

नवीन ठेकेदार नियुक्त केल्यानंतर व्यवस्थित काम सांभाळले जाण्याची अपेक्षा असताना नव्याने नियुक्त केलेला ठेकेदाराने देखील नियम व अटीशर्तींचा भंग केल्याप्रकरणी आयुक्तांनी ठेका रद्द केला आहे. यापूर्वी देण्यात आलेल्या ठेकेदाराचा ठेका रद्द झालेला असताना त्या ठेकेदाराने कंपनीचे नाव बदलून नवीन ठेका घेतलेल्या ठेकेदाराबरोबर भागीदार असल्याचा आरोप करण्यात आला होता.

■ अधिकारी हे ठेकेदाराला पाठीशी घालत असून आपला आर्थिक स्वार्थ साधत असल्याचा आरोप होताना दिसत आहे. आधीच्या ठेकेदारावर महापालिकेची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आयुक्तांनी आदेश दिले आहे. तरीदेखील अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. त्यामुळे नागरिकांत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

# मीरा-भाईंदरमधील मैदाने, इमारती, पुतळे, रुग्णालयांवर सीसी कॅमेऱ्यांचा वॉच

## पाच कोटींचा खर्च



भाईंदर, दि. ४ (सा.वा.) - शहरातील घरे, इमारती, मैदाने, पाण्याच्या टाक्या, तलाव, पुतळे, रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, महापालिकांच्या शाळा, स्मशानभूमी आदींवर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वॉच राहणार आहे. त्यासाठी महापालिकेने वार्षिक बजेटमध्ये पाच कोटींची तरतूद केली असून पालिका आयुक्त संजय काटकर यांनी मंजुरी दिली आहे. ठेकेदाराला कार्यादेश दिल्यानंतर महापालिकेच्या मालमत्ता व शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांना सीसीटीव्ही बसवण्याचे काम सुरू होणार आहे.

निविदा सिस्टीम ॲनालिस्ट व आपत्ती व्यवस्थापन विभाग यांच्याकडून शहरावर आता तिसऱ्या डोळ्याची नजर असणार आहे. त्याकरिता पालिका आयुक्त संजय काटकर यांनी नुकतीच प्राईज बीड उघडण्याची परवानगी दिली असून महापालिका फंडातून असलेल्या पालिकेच्या स्वतःच्या निधीतून सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची नजर असणार आहे. तर पालिका आयुक्त संजय काटकर यांनी आपला पदभार घेतल्यानंतर उत्तन व मीरा रोड भागात लागलेले कॅमेरे नियंत्रण कक्षाशी जोडण्याचे आदेश दिले आहेत. मीरा-भाईंदरमध्ये महापालिका व पोलिसांचे सीसीटीव्ही कॅमेरे जास्त नसल्याने त्याच्या अभावी पोलिसांना बरेच खासगी कॅमेरे तपासून तपास करावा लागतो, आता त्याच्यावरील भार कमी होणार आहे. महापालिका हद्दीत सदरील कंत्राटामधून बुलेट कॅमेरे, ऑटोमॅटिक नंबर प्लेट रेकग्निकेशन आणि चारही बाजूला फिरते कॅमेरे साधे कॅमेरे बसवण्यात येणार आहेत. २ कोटी ५० लाख रुपयांचे सीसीटीव्ही रस्ते आणि महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरे बसवण्यात येणार आहेत.

## आयुक्तांची देखरेख

ए.एन.पी.आर. कॅमेरे आणि पी.टी.झेड. कॅमेरे यामुळे रात्रीच्या वेळेस गाड्यांचे नंबर दिसतील. सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे काम पालिका आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, उपायुक्त संजय शिंदे व सिस्टीम ॲनालिस्ट मनस्वी म्हात्रे यांच्या देखरेखीखाली काम होणार आहे.

दै. सामना

Scanned with OKEN Scanner

# सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या नियंत्रण कक्षाची जबाबदारी पुन्हा पालिकेकडे



आपलं महानगर वृत्तसेवा

✦भाईंदर | मीरा- भाईंदर महानगरपालिका हद्दीत शासनाकडून आणि महापालिकेच्या फंडातून किंवा इतर निधीतून बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नियंत्रण कक्षाची जबाबदारी पोलीस प्रशासनाकडे देण्यात आली होती. तसेच घरफोडी, वाहन चोरी, चैन स्नॅचिंग तसेच अपघात आणि इतर गुन्ह्यात आरोपींना शोधून कारवाई करण्यासाठी किंवा गुन्हा उकल करण्यासाठी पालिकेकडून सदरील सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष आणि त्याचा ताबा पोलिसांकडे देण्यात आला होता. मात्र मीरारोडमधील नया नगर परिसरात घडलेल्या हिंसक घटनेनंतर ही जबाबदारी पुन्हा पोलिसांकडून पालिकेकडे घेण्यात आली आहे. आता या सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाची जबाबदारी पुन्हा स्वतः कडेच घेण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. यासाठी पूर्ण वेळ स्वतंत्र कर्मचाऱ्यांची नेमणूक केली जाणार आहे.

मीरा- भाईंदर शहर हे पूर्णतः सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या नियंत्रणाखाली आणण्याच्या सूचना गृहविभागाकडून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे एका सल्लागाराची नेमणूक करून गृहविभाग, पालिका आणि पोलीस अशा तिन्ही यंत्रणांनी एकत्र येऊन शहराचे सर्वेक्षण केले आहे. त्यानुसार शहरात सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्यासाठी एकूण १७४ कोटी रुपयांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालास शासनाने मंजुरी दिली आहे. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे हे काम रखडले आहे, हे काम सुरु होण्यास दीर्घ काळ लागण्याची शक्यता असल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपल्या परीने सीसीटीव्ही कॅमेऱ्याची उभारणी करण्याचा निर्णय पालिकेने घेतला आहे. त्यानुसार शहरात ४८ ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे उभारून भाईंदर पश्चिम येथील उड्डाण पुलाखाली नियंत्रण कक्ष उभारले आहेत.

## धार्मिक वाद उसळल्यानंतर प्रश्न समोर

अवघ्या काही महिन्यापूर्वीच या सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाचा कारभार तत्कालीन पालिका आयुक्तांनी पोलीस प्रशासनाच्या हाती सोपविला होता. त्यामुळे त्यांना गुन्हाचा तपास करण्यासह वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यास मोठी मदत झाली असल्याचा दावा पोलिसांकडून करण्यात आला होता. मात्र मागील काही दिवसापासून पोलिसांकडे पुरेषे मनुष्य बळ नसल्यामुळे पोलिसांकडून हे कक्ष बंद ठेवण्यात आले होते. त्याच दरम्यान २१ जानेवारीला शहरात धार्मिक वाद उसळण्यानंतर सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या उपयुक्ततेचा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे हे कक्ष पुन्हा पालिकेमार्फत चालवण्याचा निर्णय आयुक्त संजय काटकर यांनी घेतला.

Scanned with OKEN Scanner

# पोलीस अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या

**आपलं महानगर वृत्तसेवा**

✦**वसई ।** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मीरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालयातील अधिकाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करण्यात आल्या आहेत. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षकांच्या अंतर्गत बदल्या केल्यानंतर पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांनी पोलीस उपायुक्त आणि सहाय्यक पोलीस उपायुक्तांच्या बदल्या केल्या आहेत. मुख्यालय उपायुक्त प्रकाश गायकवाड यांची परिमंडळ-१ उपायुक्तपदी बदली करण्यात आली आहे. तर त्यांच्याजागी याच परिमंडळाचे उपायुक्त जयंत बजबळे यांनी नियुक्ती करण्यात आली आहे.

मीरा रोड विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त महेश तरडे यांची नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. त्यांच्याजागी मुख्यालयातील सहाय्यक पोलीस आयुक्त विजयकुमार मराठे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नवघरचे सहाय्यक पोलीस आयुक्त उमेश माने पाटील यांची तुळींज विभागात बदली करण्यात आली आहे. नवघर विभागात नियंत्रण कक्षातील सहाय्यक पोलीस आयुक्त बजरंग देसाई यांची बदली करण्यात आली आहे. नाशिकच्या महाराष्ट्र पोलीस अकादमीतून आलेल्या सहाय्यक पोलीस आयुक्त गितांजली दुधाने यांची मुख्यालयात नियुक्ती करण्यात आली आहे.

Scanned with OKEN Scanner

# सरावाला जागा देण्याची नाट्यसंस्थांची मागणी

✦**भाईंदर ।** मीरा-भाईंदरमध्ये नाटक निर्मिती करणाऱ्या अनेक नाट्यसंस्था आहेत. या नाट्यसंस्थांना नाटकाचे सराव करण्यासाठी स्वतःची जागा उपलब्ध नाही. त्यामुळे या नाट्यकर्मींना नाटकाचा सराव करण्यास खूप अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे या महापालिकेने नाटकाच्या सरावासाठी महापालिकेच्या वास्तूमध्ये कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी मीरा - भाईंदरमधील नाट्यकर्मींनी आयुक्त संजय काटकर यांच्याकडे केली आहे.

मीरा-भाईंदरमध्ये दहा ते पंधरा हौशी नाट्य संस्था आहेत. या संस्थांकडून गावातील यात्रांमध्ये, तसेच इतर स्पर्धांमध्ये भाग घेऊन प्रयोग केले जातात. नाटकाचे हे प्रयोग करण्यासाठी अगोदर अनेक दिवस सराव करावा लागतो. नाटकाचा सराव करण्यासाठी या नाट्यसंस्थांकडे स्वतःची जागा नाही. या संस्थांना खासगी हॉल भाड्याने घेऊन सराव करणे परवडत नाही. अशा अडचणी असताना देखील शहरातील काही नाट्यसंस्थांनी दर्जेदार नाटक निर्मिती करून राज्यस्तरीय नाट्य स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या नाट्य संस्थांना सराव करण्यासाठी महापालिकेने कायमस्वरूपी महापालिकेचे हॉल किंवा शाळांमधील मोकळी जागा उपलब्ध करून द्यावी जेणेकरून नाट्यसंस्थांना त्याचा फायदा घेता येईल त्यामुळे आयुक्त यांनी नाट्य संस्थांची गरज लक्षात घेता जागा उपलब्ध करून देण्याची मागणी स.न.वि.वि. प्रतिष्ठान आणि इतर संस्थांनी पालिका आयुक्त संजय काटकर यांच्याकडे केली आहे.

दै. आपलं महानगर

Scanned with OKEN Scanner

# विविध योजनांच्या शिबिराचे आयोजन

**आपलं महानगर वृत्तसेवा**

✦**भाईंदर** । मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या महाराष्ट्र शासनाच्या 'शासन आपल्या दारी' या योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती मीरा-भाईंदर शहरातील नागरिकांना उपलब्ध व्हावी यासाठी ५ व ६ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत विविध योजनांबाबत माहिती उपलब्ध करून देण्यासाठी आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांच्या निर्देशानुसार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

५ फेब्रुवारी रोजी मॅक्सस मॉल भाईंदर (प.), नवघर नाका, टीएमटी बस स्थानक मीरा रोड येथे आणि ६ फेब्रुवारी रोजी मॅक्सस मॉल भाईंदर (प.), गोल्डन नेस्ट सर्कल, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे भवन काशिमिरा पोलीस स्टेशन येथे हे शिबीर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरासाठी शहरातील गरजू नागरिकांनी उपस्थित राहून विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन आयुक्त तथा प्रशासक संजय काटकर यांनी केले आहे.

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ घेता यावा व योजनेची माहिती मिळावी यासाठी राज्य शासनाकडून शासन आपल्या दारी हा उपक्रम राबवला जात आहे. या शिबिरात आयुष्मान योजना, आयुष्मान क्षयरोग व इतर मोहिमेची योजना, जननी सुविधा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, पी.एम. स्वनिधी, क्षयरोग टी.बी.टी. योजना, मालमत्ता कर, उतारा, मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे, निराधार , विधवा , घटस्फोटीत महिलेच्या मुलामुलींना, शैक्षणिक आर्थिक मदत, मुली व महिलांसाठी कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत, पुरुष कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत, विधवा, निराधार महिलासाठी आर्थिक मदत (माय माऊली योजना) विविध परवाने, दिव्यांग व्यक्तींसाठी साहित्य व उपकरणे पुरवठा करणे या सर्व बाबींची माहिती देण्यात येणार आहे.

Scanned with OKEN Scanner

# ऑनलाइन पध्दतीने बेवारस वाहनांचा लिलाव

✦भाईंदर । मीरा-भाईंदर, वसई -विरार पोलीस आयुक्तलयातील वाहतूक विभागाने रस्त्यावर उभ्या असलेल्या बेवारस वाहनांवर कारवाई केली होती. ही वाहने गेल्या काही वर्षांपासून पडून आहेत. या बेवारस वाहनांचा लिलाव करण्यात आला. काशिमीरा वाहतूक विभागातील दुचाकी, चारचाकी आणि ऑटो रिक्षा अशा ११४ बेवारस वाहनांची ऑनलाइन पध्दतीने लिलाव प्रक्रिया पार पडली आहे. वाहनांचे मूल्यांकन ६ लाख ६१ हजार ८०० असे केले होते. या बेवारस वाहनांचा एम.एस.टी.सी कंपनी कडून बुधवारी लिलाव करण्यात आला. या लिलावा दरम्यान इंडियन मोटर्स कंपनी, विल नगरी सोनीपत, हरियाणाचे मालक नदीम शेख यांनी सर्वात जास्त १७ लाख ४९ हजार ९९९ रुपये बोली लावली होती. त्यामुळे सर्वात जास्त रक्कमेची बोली लावल्याने या कंपनीकडून पूर्ण रक्कम प्राप्त होताच ही वाहने त्यांच्या ताब्यात देण्यात येणार असल्याचे वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास हंडोरे यांनी सांगितले आहे.

# उत्तन येथे तीन खडकांवर दीपस्तंभ कामाचा शुभारंभ

✦ भाईंदर । उत्तन येथे दीपस्तंभ कामाचा शुभारंभ ठाणे लोकसभेचे खासदार राजन विचारे यांच्या हस्ते करण्यात आला आहे. यावेळी जिल्हाप्रमुख प्रभाकर म्हात्रे, उपजिल्हाप्रमुख लक्ष्मण जंगम, राजेश सिंग, माजी विरोधी पक्ष नेते प्रवीण पाटील, माजी नगरसेवक जॉर्जी गोविंद, शर्मिला बगाजी, महिला शहर संघटक तेजस्वी पाटील, शहर प्रमुख बर्नाड डिमेलो, जितेंद्र पाठक, उपशहर प्रमुख अशोक मोरे, विनायक नलावडे, सम्राट राऊत तसेच स्थानिक मच्छीमार, शिवसेना कार्यकर्ते उपस्थित होते.

आपलं महानगर सोमवार ५ फेब्रुवारी २०२४

Scanned with OKEN Scanner

# पोलीस आयुक्तालयामार्फत क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

भाईंदर - मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयामार्फत रविवारी सकाळी ७ च्या सुमारास भाईंदर पूर्व, सचिन तेंडुलकर मैदानात शहरात सर्वांनी एकोप्याने राहावे याकरिता क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला स्वतः पोलीस आयुक्त मधुकर पांडे उपस्थित असणार असून, त्यांनी मैदानात खेळाडूंसोबत क्रिकेट खेळत त्यांना प्रोत्साहित केले.

स्पर्धा आयोजित करण्यामागिल मुख्य कारण मीरा-भाईंदर शहरात मधल्या काळात घडलेल्या काही घटनांमुळे शहरातील वातावरण खराब झाले होते, मात्र पोलीस, राजकारणी, पत्रकार यांच्या मध्यस्तीने पुन्हा एकदा शहरात शांतता निर्माण झाली आहे. शहरातील लोकांनी एकत्रितपणे बंधुभावाने राहावे याकरिता ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत आयुक्तालयातील प्रत्येक पोलीस ठाण्यातून दोन ते तीन अधिकारी व कर्मचारी खेळण्यासाठी निवडण्यात आले होते, तसेच शहरातील उत्कृष्ट खेळाडूंचा देखील यात समावेश होता. यात कोणताही दुहेरीपणा करण्यात आला नव्हता. उत्कृष्ट खेळाडू यांना पोलीस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. खेळाडूंच्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता अशा प्रकारच्या स्पर्धा मोठ्या प्रमाणात आयोजित करण्यात याव्यात व शहरातील प्रत्येकाला त्यांच्यामधील कला सादर करता यावी याकरिता नक्कीच मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन केले जावे व त्याकरिता नक्कीच प्रयत्न करण्यात येईल, असे पोलीस उपायुक्त परिमंडळ -१ प्रकाश गायकवाड यांनी सांगितले आहे.

दै. मुंबई चौफेर

# भाईंदरमध्ये भव्य कलश यात्रेचे आयोजन

## हजारो महिलांचा सहभाग

भाईंदर - मीरा रोड येथील एसके स्टोन ग्राऊंडवर ५ ते १३ फेब्रुवारीदरम्यान अपक्ष आमदार गीता जैन यांच्या वतीने भव्य रामकथेचे आयोजन करण्यात येत आहे. पद्मविभूषण जगद्‌तगुरू स्वामी रामभद्राचार्य यांच्या उपस्थितीत रामकथेचे पठण होणार आहे. स्वामीजीच्या आगमनापूर्वी रविवारी भाईंदर पूर्वेच्या गोल्ड नेस्ट कॉम्प्लेक्स ते एसके स्टोन ग्राऊंडपर्यंत भव्य कलश यात्रा काढण्यात आली. संपूर्ण परिसर रामाला समर्पित करण्यात आला आहे. रंगीबेरंगी वेशभूषेतील हजारो महिला डोक्यावर कलश घेऊन कलश यात्रेत सहभागी झाल्या होत्या. यामध्ये उत्तराखंड समाजातील हजारो महिलांही कलश यात्रेत सहभागी झाल्या होत्या. कलश यात्रेत शाळकरी मुलांचा ही रंगारंग मिरवणुकीत सहभाग होता.

Scanned with OKEN Scanner

# मनसेत मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश

भाईंदर - मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विचारांवर प्रेरित होऊन मनसे नेते अविनाश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच मीरा-भाईंदर शहराचे नवनिर्वाचित शहर अध्यक्ष संदीप राणे यांच्या नेतृत्वाखाली डॉक्टर, शिवसेना (उ.बा.ठा) गटातील काही महत्त्वाचे पदाधिकारी व २५० हून अधिक वेगवेगळ्या क्षेत्रांतील अनेक नागरिकांनी रविवारी शिवतीर्थ येथे राजसाहेब ठाकरे यांच्या उपस्थितीत मनसेत जाहीर पक्ष प्रवेश केला.

संदीप राणे यांच्या शहर अध्यक्ष नियुक्ती नंतर मीरा-भाईंदर शहरात उत्साहाचे वातावरण तसेच नव चैतन्य निर्माण झाले आहे असे यावेळी मनसे नेते सन्माननीय अविनाश जाधव यांनी सांगितले असून, येणाऱ्या काळात अनेक डॉक्टर, वकील, सी.ए. तसेच अनेक पक्षांतील पदाधिकारी देखील मोठ्या संख्येने पक्ष प्रवेश करणार असून, मीरा-भाईंदर शहर पूर्णपणे मनसे मय होणार, असे आश्वासन संदीप राणे यांनी यावेळी दिले.

www.prahaar.in
epaper.prahaar.in
@PrahaarNewsLive

दै. प्रहार

### काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आयुक्तांना साकडे

# भारतरत्न लता मंगेशकर नाट्यगृह दगडांच्या विळख्यात

**भाईंदर (वार्ताहर) :**

मीरा-भाईंदरच्या नाट्य रसिकांचे श्रद्धास्थान ठरलेले भारतरत्न गान सम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह काही दिवसांपासून दगडांच्या विळख्यात अडकल्याने रसिकांच्या काळजाला प्रचंड वेदना होत आहेत त्याच बरोबर नाट्य रसिकांचा जीवही धोक्यात आला आहे.

मीरा-भाईंदर महानगरपालिकेने महाजन वाडी भागात साधारण ६० कोटी रुपये खर्च करून भारतरत्न गान सम्राज्ञी स्वर्गिय लता मंगेशकर नाट्यगृह उभारले. एक हजार आसन व्यवस्था असलेले तसेच ३०० आसन व्यवस्था असलेले मिनी नाट्यगृह उभारले. १८ ऑक्टोबर २०२२ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण झाले. आणि अल्पावधीतच ते प्रचंड लोकप्रिय झाले आणि नाट्य रसिकांसह सर्वांच्या हृदयात घर करून बसले. तेच नाट्यगृह आता दगडांच्या विळख्यात गुरफटले आहे. महानगरपालिकेने काही दिवसापासून भिंत बांधण्याचे काम सुरू केले आहे. महानगरपालिकेने तेथे कोणतेही सूचना फलक किंवा कुंपण लावलेले नाही. त्यामुळे प्रेक्षक कधीही खड्ड्यात पडू शकतात त्यांना गंभीर दुखापत सुद्धा होऊ शकते. अशा प्रकारच्या अनेक तक्रारी मनसे कार्यालयात



आल्याने विभागीय सचिव सचिन जांभळे आणि उप विभाग अध्यक्ष करण हरिजन यांनी नाट्यगृहाला भेट देऊन पाहणी केली. त्यावेळी नाट्यगृहात एका शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम होता.

लहान मुले शाळेत जाताना याच मार्गाने ये जा करत होते. तर पालक खड्ड्याच्या पलीकडून आपल्या मुलांना बघून हातवारे करत होते त्यावेळी कोणताही अपघात होण्याची शक्यता असते. सदर काम अत्यंत संथ गतीने सुरू आहे. ते प्राधान्याने करून घेण्याची आवश्यकता आहे याची जाणीव झाल्याने सचिन जांभळे आणि करण हरिजन यांनी तात्काळ आयुक्त संजय काटकर यांना पत्र पाठवून सुरक्षितेच्या दृष्टीने नाट्यगृह परिसरातील अर्धवट राहिलेले काम तात्काळ पूर्ण करण्याची विनंती केली आहे.

# 'मीरा-भाईंदरच्या आगामी अर्थसंकल्पात नवीन करवाढ नको'

◆ भाईंदर (वार्ताहर) : दै. प्रहार

मीरा-भाईंदर महानगरपालिकेचा प्रशासकीय राजवटीतील दुसरा अर्थसंकल्प आयुक्त सादर करणार आहेत, आगामी अर्थसंकल्प सादर करताना पाणी पट्टी, मालमत्ता करात कोणत्याही प्रकारे नवीन करवाढ, दरवाढ करू नये अशी मागणी मीरा भाईंदर काँगेसने केली आहे.

काँग्रेसचे प्रदेश प्रतिनिधी तथा जिल्हा प्रवक्ते प्रकाश नागणे यांनी महापालिका आयुक्त संजय काटकर यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, गेल्या अर्थसंकल्पात १०% रस्तेकर आकारण्याचा प्रशासकीय निर्णय घेतल्यानंतर त्याची अंमलबजावणी सुरू करण्यात आली होती. तरी देखील रस्त्यांची दुर्दशा



कायम आहे. विविध शीर्षकाखाली मालमत्ता देयकात दरवाढ करून करवाढ केली जाते. उत्पन्नाचे स्रोत वाढविण्याच्या नावाखाली नव्याने करवाढ लादून सर्वसामान्य जनतेवर आर्थिक भार टाकणे अयोग्य आहे. एकीकडे करवाढ केली तरी शहरवासीयांना त्या प्रमाणात सेवासुविधा मिळत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. पाणी देयकात वाढ करूनही शहरवासीयांना मुबलक प्रमाणात पाणीपुरवठा होत नाही. आस्थापनांसह इतर प्रशासकीय खर्चावर नियंत्रण ठेवण्याची गरज आहे. राज्यशासनाकडून वेळेवर अनुदान प्राप्त होत नाही यासाठी विद्यमान सत्ताधारी आमदारांच्या मदतीने ते मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता असून विकासकामांच्या नावाखाली विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज काढून कर्जाचा डोंगर वाढवत व्याजापोटी लाखो रुपये अदा करणे कितपत योग्य आहे? असा प्रश्नही उपस्थित केला आहे. आगामी अर्थसंकल्प सादर करताना कोणत्याही प्रकारची नवीन करवाढ न करता, शहरवासीयांना दिलासा देण्याची मागणी प्रकाश नागणे यांनी आयुक्त संजय काटकर यांच्याकडे केली आहे.

# मीरा-भाईंदरमध्ये 'शासन आपल्या दारी'

**भाईंदर:** 'शासन आपल्या दारी' या योजनेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती लोकांना देण्याच्या उद्देशाने मीरा-भाईंदर महापालिकेकडून येत्या 6 व 7 फेब्रुवारी रोजी सकाळी 10 ते सायंकाळी 5 च्यादरम्यान दोन दिवसीय शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

आयुक्त संजय काटकर यांनी सदर शिबिराचे आयोजन करण्यासाठी मागील आठवड्यात पालिका उपायुक्त व अधिकारी यांची बैठक आयोजित करून सदर शिबिरात शासकीय योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी जबाबदारी सोपवली आहे.

शासन आपल्या दारी ही योजना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असून या शिबिराचे आयोजन 6 फेब्रुवारी रोजी भाईंदर पश्चिमेकडील मॅक्सस मॉल, भाईंदर पूर्वेकडील नवघर नाका व मीरारोड रेल्वे स्थानक येथील टिएमटी बस स्थानक येथे करण्यात आले. तर 7 फेब्रुवारी रोजी काशिमीरा पोलीस ठाणे मागील साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे भवन येथे करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले

या शिबिरात भारत सरकारची आयुषमान योजना, आयुषमान क्षयरोग व इतर योजनासह जननी सुविधा योजना, प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना, पी. एम. स्वानिधी, क्षयरोग टीबीटी योजना, पालिकेची मालमत्ता कर, उतारा, मालमत्ता हस्तांतरण नोंदणी प्रमाणपत्र, निराधार, विधवा व घटस्फोटीत महिलेच्या मुला, मुलींना शैक्षणिक तसेच माय माऊली योजनेंतर्गत वैयक्तिक आर्थिक मदत, मुली व महिला व पुरुषांना कॅन्सर उपचारासाठी आर्थिक मदत, विविध शासकीय व प्रशासकीय परवाने, आदींची माहिती देण्यात येणार आहे.

Scanned with OKEN Scanner

# मीरा रोड में हवनात्मक चंडी महायज्ञ

**मीरा रोड (प्रति.),** विगत कई वर्षों से परमपूज्य राजेश्वर महाराज द्वारा मीरा भाईंदर की धरती पर नवकुण्डीय हवनात्मक चंडी महायज्ञ का आयोजन होते आया है। इसी कड़ी में इस वर्ष भी उपरोक्त कार्यक्रम आयोजित है। मुख्य महाराज राजेश्वर महाराज ने बताया कि पिछले 28 जनवरी से प्रतिदिन 50 परिवार से ज्यादा भक्त हवन कर रहे हैं जो चार चरणों में पूरा हो रहा है। हवन पूर्ण कर भक्त स्थापित देवी मां का दर्शन कर कुंड की परिक्रमा कर रहे हैं। आयोजक सुरेश सिंह ने बताया कि जिस प्रकार से सनातन धर्म के प्रति लोगों का प्रेम बढ़ रहा है यह अपने आप में सराहनीय है। उपरोक्त



हवनात्मक यज्ञ यूनिक कोरम बिल्डिंग के सामने, पूनम गार्डन मीरा रोड पूर्व में 5 फरवरी तक चलेगा। हवनात्मक यज्ञ में भाजपा मीरा भाईंदर जिलाध्यक्ष (उ भा मो) सुरेश सिंह, समाजसेवक रत्नाकर मिश्रा, कमलेश दुबे, अधिवक्ता डी. के. पाण्डेय, राजेश मिश्रा, के साथ साथ भक्त गण कार्यरत हैं।

Scanned with OKEN Scanner

## श्री श्याम उत्सव मंडल, भायंदर

# बाबा श्याम का सजेगा दरबार

## ▶▶ पहली बार दिल्ली के सुप्रसिद्ध कारीगर बना रहे भव्य झांकी




**जागरूक टाइम्स संवाददाता**


**मीरा-भायंदर।** श्री श्याम उत्सव मंडल, भायंदर द्वारा द्वितीय वार्षिक महोत्सव 'एक शाम सांवरिया के नाम' का आयोजन रविवार 11 फरवरी को एमबीएमसी ग्राउंड, नेक्स्ट सेवन स्क्वायर स्कूल, रामदेव पार्क रोड़, मीरा रोड (पूर्व) में किया जा रहा है। संस्थापक ट्रस्टी विकास केडिया ने जानकारी देते हुए बताया कि मुख्य संरक्षक विनीता सुनील पाटोदिया, संरक्षक श्रवण गोयल के मार्गदर्शन में सुबह 8 बजे से प्रसिद्ध पाठ वाचक कुंदन मिश्रा द्वारा श्री श्याम अखंड ज्योत पाठ किया जाएगा। उसके बाद शाम 4 बजे से सुमधुर संगीतमय विशाल भजन संध्या का आयोजन होगा जिसमें जयपुर राजस्थान से सुप्रसिद्ध भजन सम्राट गायिका रजनी राजस्थानी, कोलकाता से विवेक शर्मा, मुंबई से मोनिका अग्रवाल एवं योगेश सुरेका अपने अपने भजनों से श्याम भक्तों को रिझाएंगे। बाबा श्याम का भव्य दरबार, श्री श्याम अखंड ज्योत पाठ, छप्पन भोग, महाप्रसाद एवं सुमधुर संगीतमय विशाल भजन संध्या का आयोजन होगा। कार्यक्रम में यजमान संजय गुप्ता, रामप्रकाश बूबना, श्री खाटू श्याम भक्त परिवार, सुमन रमेश कोठारी, राजकुमार केडिया, दिनेश कानोडिया, अशोक सर्राफ, प्रवीण बंसल, पवन अग्रवाल, अनिल अग्रवाल, विनय जैन, सुरेंद्र सितानी, मुकेश अग्रवाल, विष्णु गर्ग, आदर्श तोदी आदि होंगे। मंडल के ट्रस्टी अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, सचिव सुभाष सिंघानिया, कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, नारायण सिंघानिया, नरेश केडिया, संजय पोदार, विनय बाछुका, रितेश बुरड़, रामावतार जांगिड़, सुमित लखोटिया, सुरेंद्र गुप्ता, श्रीकांत केडिया, नरेश पी केडिया एवं अन्य सभी सदस्य प्रयासरत हैं।

Scanned with OKEN Scanner

# मीरा भायंदर में सजेगा बाबा श्याम का दरबार

प्रातःकाल संवाददाता

मुंबई। श्रीश्याम उत्सव मंडल, भायंदर द्वारा द्वितीय वार्षिक महोत्सव एक शाम सांवरिया के नाम का आयोजन रविवार 11 फरवरी को एमबीएमसी ग्राउंड, मीरा रोड (पूर्व) में किया जायेगा। संस्थापक ट्रस्टी विकास केडिया ने बताया कि मुख्य संरक्षक विनीता सुनील पाटोदिया, संरक्षक श्रवण गोयल के मार्गदर्शन में सुबह 8 बजे से कुंदन मिश्रा द्वारा श्रीश्याम अखंड ज्योत पाठ किया जाएगा। शाम 4 बजे से भजन संध्या का आयोजन होगा, जिसमें जयपुर से भजन गायिका रजनी राजस्थानी, कोलकाता से विवेक



शर्मा, मुंबई से मोनिका अग्रवाल एवं योगेश सुरेका भजनों से श्याम भक्तों को रिझायेंगे। कार्यक्रम में बाबा श्याम का दरबार, श्रीश्याम अखंड ज्योत पाठ, छप्पन भोग, महाप्रसाद एवं संगीतमय भजन संध्या का आयोजन होगा। कार्यक्रम में यजमान संजय गुप्ता, रामप्रकाश बूबना, श्रीखाटू श्याम भक्त परिवार, सुमन रमेश कोठारी, राजकुमार केडिया, दिनेश कानोडिया, अशोक सर्राफ, प्रवीण बंसल, पवन अग्रवाल, अनिल अग्रवाल, विनय जैन, सुरेंद्र सितानी, मुकेश अग्रवाल, विष्णु गर्ग, आदर्श तोदी होंगे। मंडल के ट्रस्टी अध्यक्ष राजेंद्र अग्रवाल, सचिव सुभाष सिंघानिया, कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, नारायण सिंघानिया, नरेश केडिया, संजय पोदार, विनय बाछुका, रितेश बुरड़, रामावतार जांगिड़, सुमित लखोटिया, सुरेंद्र गुप्ता, श्रीकांत केडिया, नरेश पी केडिया एवं सदस्य सक्रिय हैं।

Scanned with OKEN Scanner

नवभारत

# भाग्यश्री व धनश्री बहनों ने बहाई भक्ति की गंगा

## ज्योतकर गुरुजी शिव गौरव पुरस्कार से हुए सम्मानित




■ भायंदर, नवभारत न्यूज नेटवर्क.अयोध्या में प्रभु श्री रामलला के प्राण प्रतिष्ठा महोत्सव में अपनी संगीत की सुमधुर प्रस्तुति के लिए विशेष रूप से महाराष्ट्र से आमंत्रित की गई भाग्यश्री और धनश्री वाटकर बहनों ने रविवार की सुबह मीरा -भायंदर के बालासाहेब ठाकरे मैदान में प्रताप सरनाईक फाउंडेशन व संस्कृति युवा प्रतिष्ठान द्वारा आयोजित चार दिवसीय विहंग संस्कृति मीरा भायंदर आर्ट फेस्टिवल के चौथे दिन अपनी सुर और साज से भक्ति गंगा की ऐसी मनमोहक धारा बहाई कि श्रोता अपनी कुर्सी से उठकर नाचने और झूमने को मजबूर हो गए. इससे पूर्व शनिवार को आर्ट फेस्टिवल के सांध्य सत्र में स्वर गंधार और जीवन गाणी के संयोजन में गीत रामायण की सुंदर गायन व नृत्य के माध्यम से प्रस्तुति की गई.

## मीरा भायंदर आर्ट फेस्टिवल

गायकों की सुंदर स्वरों से पूरा वातावरण राममय हो गई थी. इस विहंग मंच पर अयोध्या में प्रभु श्री राम के प्राण प्रतिष्ठा वैदिक मंत्रोचार और विधि विधान से संपन्न कराने वाले वेद मूर्ति गजानन दिलीपराव ज्योतकर गुरूजी को मुख्य अतिथि गायिका अमृता फडणवीस के हाथों इस वर्ष का शिव गौरव पुरस्कार देकर गौरवान्वित किया गया. ज्योतकर गुरूजी महाराष्ट्र राज्य के बीड़ जिला के मुख्य निवासी हैं. वे वर्तमान में काशी हिंदू विश्वविद्यालय में संस्कृत विषय के शिक्षक हैं. साथ ही वे पीएचडी में अध्ययनरत भी हैं. विधायक सरनाईक ने गुरूजी का कौतुक करते हुए कहा कि अयोध्या के श्रीराम मंदिर के साथ गुरूजी और महाराष्ट्र का नाम युगों-युगों तक के लिए अजर अमर हो गया है.



Scanned with OKEN Scanner

नवभारत

QUICK NEWS

# 'एक शाम सांवरिया के नाम' 11 को

मीरा रोड. श्री श्याम उत्सव मंडल, भायंदर द्वारा द्वितीय वार्षिक महोत्सव 'एक शाम सांवरिया के नाम' का आयोजन 11 फरवरी को एमबीएमसी ग्राउंड, सेवन स्क्वायर स्कूल के पास,रामदेव पार्क रोड, मीरा रोड (पूर्व) में किया जा रहा है. संस्थापक ट्रस्टी विकास केडिया के अनुसार सुबह 8 बजे से कुंदन मिश्रा द्वारा श्री श्याम अखंड ज्योति पाठ एवं शाम 4 बजे से सुमधुर संगीतमय विशाल भजन संध्या का आयोजन होगा, जिसमें भजन सम्राट गायिका रजनी राजस्थानी, विवेक शर्मा, मोनिका अग्रवाल एवं योगेश सुरेखा अपनी-अपनी प्रस्तुति देंगे.

Mumbai-plus Edition
05-february-2024 Page No. 2
epaper.enavabharat.com

Scanned with OKEN Scanner